शिक्षणातील आनंदासाठी..

वर्ष सातवे । अंक तिसरा । एप्रिल २०१३ । मूल्य ₹ ३५/-

मासिक

# जडण-घडण

(विद्यार्थी, शिक्षक, पालकांचे संयुक्त व्यासपीठ)





डॉ. रघुनाथ माशेलकर
मानद संपादक

डॉ. सागर देशपांडे
मुख्य संपादक

२३ एप्रिल -
जागतिक ग्रंथदिनाच्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा

## जागतिक ग्रंथदिन विशेष

**- भालचंद्र नेमाडे**




ख्यातनाम उद्योगपती आणि जळगावच्या जैन उद्योगसमूहाचे संस्थापक पद्मश्री भवरलाल जैन यांनी लिहिलेल्या 'ती आणि मी' या पुस्तकाच्या गेल्या २-३ वर्षात ८० हजार प्रती वाचकांपर्यंत पोचल्या आहेत. या पुस्तकाला ख्यातनाम साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेचा हा संपादित अंश.

आमचे साहित्यिक मित्र रा. भवरलाल जैन यांनी लिहिलेले प्रस्तुत आत्मचरित्र अनेक पातळ्यांवरून अनुभवता येईल, इतके ते विचारगर्भ आहे. तथापि त्याचे मध्यवर्ती आशासूत्र सर्वांच्या काळजाला भिडणारे ठरेल. ते म्हणजे आपल्या प्रिय सहचारिणी कांताबाई यांच्या वियोगाचा आघात त्यांनी कसा सोसला ?

त्यांनी कांताबाईंच्या पहिल्या भेटीपासून घडत गेलेला काळ पुन्हा जणू जगून त्याला जिवंतपणे आपल्यासमोर उभे केले. स्वतः रा. भवरलाल चार पाच वेळा मृत्यूच्या भेटीला निधडेपणे जाऊन आले आहेत. मृत्यू हे एक भीतिदायक, थंडगार करणारे सत्य आहे. या विधिघटनेसमोर माणूस दुःखाने दुभंगून जातो. विरक्तीची छाया पसरते. या दुःखाला उत्तर सापडत नाही. माणसाच्या या असहाय्यतेमुळे धर्म निर्माण झाले, असे मानले जाते. याच दुःखाला सांत्वन नसते. यामुळे गेलेल्या माणसाची भरपाई होत नाही. जैन आणि बौद्ध हे निरीश्वरवादी धर्म, इतर धर्मापेक्षा जीवनमरणाचा संबंध त्यातल्या त्यात विवेकाने लावतात. बहुधा या प्रभावामुळे रा. भवरलाल यांनी धार्मिक अंधश्रद्धांचा कुठेही आसरा न घेता आपले दुःख पेललेले दिसते.

अशा प्रसंगी आत्मशोध हाच आधुनिक व्यक्तीला अधिक चिरंतन आसरा देणारा ठरला. 'ती आणि मी' हा रा. भवरलाल यांचा असा प्रामाणिक आत्मशोध आहे. या त्यांच्या आत्मशोधातून आज आपल्याला संभ्रमित करणारे अनेक प्रश्न ऐरणीवर आले आहेत. हिंदू (= भारतीय या अर्थी) विवाहसंस्थेचे स्वरूप, हिंदू कुटुंबसंस्थेच्या स्थैर्याचा या विवाहसंस्थेशी असलेला सेंद्रिय



संबंध, हिंदू विवाह संस्था आणि स्त्रीचे स्थान, स्त्रीस्वातंत्र्य वगैरे व्यक्तिवादी मूल्ये. परंतु त्यांना लागलेला सर्वाधिक महत्त्वाचा शोध म्हणजे, भवरलाल जैन हे कोण होते?असं विचारल्यावर उत्तर आले, कांताबाईंचे ते पती होते. हिंदू विवाहसंस्थेचा हा मध्यवर्ती घटक आहे.

'स्मृतिचित्रे' (१९३४) हे लक्ष्मीबाई टिळक या साध्या गृहिणीने लिहिलेले आत्मचरित्र. मराठीत सर्व थरातल्या वाचकांनी गौरवलेला हा अक्षरग्रंथ आहे, हे निरनिराळ्या सर्वेक्षणांमधून सिद्ध झाले आहे. हे आत्मचरित्र म्हटले जाते. परंतु ते नकळत लक्ष्मीबाईंचे पती रेव्हरंड नारायण वामन टिळक या कवीचे चरित्रही झाले आहे. 'ती आणि मी' हे रा. भवरलाल यांचे आत्मचरित्रही असेच कांताबाई जैन यांचे चरित्र झाले आहे. आपल्या विवाहसंस्थेचे हे अगम्य असे रूप आहे, की पती-पत्नी हे उशिरा विवाहोत्तर एकत्र येऊनही किती एकमेकांशी एकरूप होऊ शकतात. आत्मचरित्राच्या सीमा ओलांडून चरित्रात जाणाऱ्या कथनांचे रहस्य या हिंदू विवाहसंस्थेतल्या संस्कारांशी निगडित आहे. पतिव्रतांचे आदर्श आपल्या संस्कृतीत अनेक आहेत. परंतु हिंदू विवाहपद्धत एकपत्नीव्रती पुरुषांमुळे भक्कम झाली आहे, हे फारसे ध्यानात घेतले जात नाही. दक्षिण अमेरिकेत अचानक गायब होणारे नवरे (disappearing husbands) हा एक सामाजिक प्रश्न आहे. इंग्लंड- अमेरिकेत घटस्फोटित स्त्री पुरुषांची संख्या निम्म्यावर जाऊ पाहते आहे. एकपालकी कुटुंबे प्रचंड संख्येने अमेरिकेत वाढत आहेत. हिंदू विवाहसंस्थेचे हे जनसमूहांचे सामाजिक स्थैर्य शतकानुशतके अबाधित राहिले आहेत. याचा संबंध राष्ट्रीय आणि एकूण मानवी समाजाच्या मानसिक आरोग्याशी जोडला गेला पाहिजे. युनोने दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरच दरडोई कौटुंबिक समाधान हाही एक प्रगतीचा पॅरामीटर ठरवला पाहिजे.

आधुनिक काळात आपण कोणीही अर्थातच व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध असू नये,

परंतु स्वातंत्र्याची परिभाषके निश्चित नसल्याचे दुष्परिणाम आपण गेल्या दोन शतकात वसाहतकाळात अनुभवले आहेत. आपल्या परंपरेतल्या नैसर्गिक न्यायाने उत्क्रांत होत आलेल्या कितीतरी देशी व्यवस्था परक्या संस्कृतीच्या अव्याहत दडपणाखाली मोडीत निघाल्या. अनेक सहस्रकांपासून विकसित होत आलेल्या आपल्या ग्रामसंस्था इंग्रजी वसाहतवादाने पायाखालीच पोखरून काढल्या. सत्तेचे आदर्श असे विकेंद्रीकरण आणि गणतंत्राचा आदर्श आविष्कार असलेली आपली ग्रामव्यवस्था दिल्ली मुंबईशी जोडून त्यांचे सत्त्व इतके नष्ट करण्यात आले, की आता पंचायत राजच्या घोषणा करून फारसा उपयोग होत नाही. दुसरा आघात संयुक्त कुटुंबावर झाला. आपली विवाहपद्धती हा विडंबनाचा विषय झाला. यात साहित्यिकांचा मोठा वाटा आहे. आपल्या देशी आर्थिक-सामाजिक संसाधनांचे भान न ठेवता रोमँटिक पद्धतीचा व्यक्तिवाद बोकाळला.

रा. भवरलाल यांच्या विवाहपूर्व आणि विवाहोत्तर आलेखात हिंदू संयुक्त कुटुंबातल्या समूहमानसाची मानवतावादी बाजू फार प्रभावीपणे मांडली आहे.

हे कुटुंब मोडूच नये, याची चिंता या गृहिणीच वाहत असतात. ५० वर्षांच्या परिप्रेक्ष्यातून हे एखाद्या गृहिणीचे केंद्रस्थानात राहणे किती लोभस असते, हे रा. भवरलाल यांनी काव्यात्म वृत्तीने वर्णन केले आहे. आपली जोडीदारीण गेल्याची वेदना त्यांच्या संयत कथनाने, कुठेही भावनावशता टाळून गेली आहे.

या पुस्तकात जागोजागी संयुक्त कुटुंबाला जाणाऱ्या लहान-मोठ्या तड्यांचे उल्लेख येतात. सुदैवाने या कुटुंबाला इतर बहुसंख्य कुटुंबात कलह पेरणाऱ्या आर्थिक टंचाईचा स्पर्श नाही, परंतु या अनेक जणांच्या कुटुंबातले मानसिक संतुलन हरघडी सांभाळल्याची वास्तव उदाहरणे ठिकठिकाणी येतात. यात कांताबाईंनी उपजतबुद्धीने सांभाळून घेतलेली उभी, आडवी आणि बाजूची सर्व नाती, सर्व वयोगटांमधली माणसे, मुले, ज्येष्ठ सभासद आसऱ्याला आलेले, परके, पाहुणे असे अनेकविध संबंधांचे त्यांच्याभोवतीचे भावनिक जाळे पाहिल्यानंतर हिंदू गृहिणीला कराव्या लागणाऱ्या भूमिकांची जटिल बहुविधता लक्षात येते. इतक्या पातळ्यांवर आणि बदलत्या कोनांमध्ये कार्यरत असलेले हे व्यक्तिमत्त्व मोठ्या तितिक्षेची परंपरा चालवताना दिसते. हे निसर्गतःच घडणाऱ्या त्यागाचे धडे खोलवरच्या संस्कारांशिवाय शक्य नसतात. खरेतर आपण ज्या रोजच्या व्यवहारांना क्षुद्र समजतो, ती मोठी मूल्ये आहेत - काटकसर, साधेपणा, सहनशीलता, आतिथ्य, नम्रता ही उद्याच्या जगाची मूल्ये असून, जगातल्या तथाकथित प्रगत संस्कृतींनाही शिकावी लागणार आहेत, असे वारे हल्ली सगळीकडून वाहते आहे.

वस्तुतः रा. भवरलाल जैन हे आपल्या देशातले एक आघाडीचे उद्योजक असून, जैन कुटुंबाची सांस्कृतिक कर्तबगारीही कमी नाही. नऊ वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेला सज्जनशक्तीचा विचार आपल्या लोकशाहीचा मुळापासून विचार करायला लावणारा होता. त्यांचे व्यक्तिमत्त्वही अनेक पैलूंचे आहे. केवळ मित्र म्हणून मी त्यांची स्तुती करणे येथे टाळतो. तथापि, अशा कर्तृत्वशाली व्यक्तिमत्त्वाप्रमाणे कोणती ऊर्जा क्रियाशील असते, याचे आकलन होण्यासाठी 'ती आणि मी' हे आत्मचरित्र वाचकांना उद्‌बोधक ठरेल.

रा. भवरलाल यांनी आपले स्वतःचे असे स्मरणतंत्र विकसित केले आहे. एखाद्या कुशल साहित्यिकाच्या शैलीप्रमाणे कांताबाईंचा जीवनप्रवास निवडक प्रसंगांमधून त्यांनी रेखाटला आहे. मुलगी पाहताना भारतीय नवरदेव किती परिभाषके वापरतो, हे त्यांनी सुरुवातीला कांताबाईंशी केलेल्या चतुर संवादातून व्यक्त केले आहे. तेव्हापासून कांताबाईंची छाया निवेदनातून अधिकाधिक गडत होत जाते. त्यांच्या अंगी पत्नी, गृहिणी, संयुक्त कुटुंबातले अखंड चाललेले ताणतणाव सैल करण्याचे शहाणपण आणि मनाचा मोठेपणा आहे. खानदेशातल्या एका लहानशा खेड्यात नेकीनं जगणाऱ्या कष्टाळू मारवाडी कुटुंबाची पारंपरिक घडी विस्कटू न देता रा. भवरलाल आणि कांताबाई या नव्या पिढीच्या जोडप्याने या संपूर्ण परिवाराला यशाच्या उत्तुंग शिखरावर नेले. हे आपल्या एकूण देशाच्या गतिमानतेचे मानचित्र ठरेल, असे तेजस्वी उदाहरण आहे. पण या प्रगतीसाठी या दोघांनाही किती तारेवरच्या कसरती आयुष्यभर कराव्या लागल्या असतील, याचे धावते, चटका लावणारे कथन 'ती आणि मी' मध्ये वाचकांना दिसेल.

रा. भवरलाल उद्योजक झाले नसते तर साहित्यिक झाले असते, असे स्वतःबद्दल म्हणतात, ते अर्धसत्यच म्हणावे लागेल, कारण आता ते दोन्ही आहेत. मराठीत उद्योजक साहित्यिकांची संख्या वाढावी, अशी अपेक्षा या पुस्तकाच्या निमित्ताने व्यक्त करावीशी वाटते. मराठीत लिहिणे हे मराठीवर प्रेम व्यक्त करण्याची प्राथमिक कसोटी आहे. उद्योजक म्हणून त्यांनी खानदेशासारख्या शेतीप्रधान आणि उद्योग-निरक्षर भागात क्रांती केली, शून्यातून मोठे औद्योगिक साम्राज्य उभारले. याचा इकडे हिमाचल प्रदेशातसुद्धा उल्लेख होत असतो, हे इकडे गेली दोन वर्षे मी ऐकतो आहे. या सर्व विस्तारशीलतेमध्ये कांताबाई यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या समृद्ध संस्कारामधून घडलेले त्यांचे सुपुत्र रा. अशोक, अनिल, अजित आणि अतुल या चौघांचेही पाळणे या चरित्रगृहात हाललेले आहेत. जैन कुटुंब

पुढील मजकूर पान क्र. ६२ वर

बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे संचालक म्हणून नेमणूक झाली. ही संस्था संपूर्णपणे संशोधनाला वाहिलेली असल्यामुळे अध्यापनाचं काम नव्हतं. त्यामुळे पूर्णपणे संशोधनामध्ये ते मग्न राहिले. इथे त्यांनी केलेलं बहुतेक सर्व संशोधन रॉयल सोसायटीमार्फत प्रसिद्ध झालं. त्यांचा जगभर गौरव होऊ लागला. त्यांना देशा विदेशामधून निमंत्रणं यायला लागली. १९३९ मध्ये स्ट्रासबुर्ग येथे भरलेल्या जागतिक (कर्ष्युकशास्त्र) मॅग्नेटिझमवरील परिषदेत त्यांना खास आमंत्रण दिलेलं होतं. १९४० मध्ये त्यांना रॉयल सोसायटीचे सभासद (एफ. आर. एस.) हा सन्मान मिळाला.

१९४२ मध्ये त्यांनी अलाहाबाद विद्यापीठातील प्राध्यापकपदाचा स्वीकार केला. क्ष किरण आणि इलेक्ट्रॉनचे विकिरण, वेव्ह मेकॅनिझम, स्टॅटिस्टिकल थर्मोडायनॅमिक्स हे त्यांचे आवडते विषय होते.

भारतातील शास्त्रज्ञांना संशोधनासाठी अनुकूल वातावरण असावं त्यासाठी स्वतंत्र संशोधन संस्था असाव्यात त्याला सरकारने आर्थिक पाठबळ द्यावं असा विचार स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू होता. दिल्लीमध्ये नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी आणि पुण्यामध्ये नॅशनल केमिकल लॅबोरेटरीची स्थापना झाली. १९४७ साली नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीचे प्रमुख म्हणून प्रा. कृष्णन् यांनी जबाबदारी स्वीकारली. प्रथम संस्थेची नव्याने उभारणी करण्यामध्ये त्यांचा वेळ गेला खरा पण लवकरच त्यांना उत्तम सहकारी मिळाले आणि त्यांनी वेगाने संशोधन सुरू केले.

प्रा. सी. व्ही. रामन्, प्रा. एस. एन. बोस यांच्याप्रमाणे प्रा. कृष्णन् यांनाही भारत सरकारने राष्ट्रीय प्राध्यापक नेमलं. १९५३ मध्ये त्यांना पद्मभूषण हा सन्मान मिळाला. १९५५ मध्ये अमेरिकेतील नॅशनल अॅकेडमी ऑफ सायन्सेस या संस्थेने प्रा. कृष्णन् यांना मुख्य पाहुणे म्हणून निमंत्रित केलं यावरून त्यांच्या संशोधनाच्या दर्जाची कल्पना येते. असा बहुमान फार कमी भारतीयांना मिळाला आहे. भारत सरकारतर्फे देण्यात येणारं शांतिस्वरुप भटनागर पारितोषिक त्यांना देण्यात आलं. १४ जून १९६१ मध्ये काळाने त्यांना या जगातून ओढून नेलं. असलं तरी त्यांचं संशोधन पुढील पिढ्यांना प्रेरणादायी ठरलं आहे.

■ ■ ■

पान क्र. १२ वरून

आपल्या गावांमधल्या ग्रामपंचायती आता ज्ञानपंचायती झाल्या पाहिजेत. ज्ञानाधिष्ठित समाजाच्या उभारणीसाठी शिक्षण संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. विज्ञान शिक्षणाची आता पुनर्रचना करणं गरजेचं असून महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात किमान एक विज्ञान शिक्षण केंद्र स्थापन झालं पाहिजे. त्यादृष्टीने रयत विज्ञान परिषद एक पुढचं पाऊल आहे असं डॉ. माशेलकर म्हणाले.

**विज्ञान परिषदेतील आकर्षण**

विज्ञान परिषदेत मांडण्यात आलेल्या विविध उपकरणांच्या प्रतिकृती आणि विज्ञानाचे प्रयोग पाहण्यासाठी तीन दिवस विद्यार्थी-शिक्षकांनी रांगा लावल्या होत्या. २७ फूट उंचीच्या मॉडेलच्या साहाय्यानं करण्यात आलेलं उपग्रहाचं प्रक्षेपण, अणुभट्टीचं मॉडेल, विद्युतऊर्जा निर्मिती, रासायनिक अभिक्रियेच्या साहाय्यानं न्यूक्लिअर फिशन यांसह विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित प्रतिकृती, **मायक्रोस्कोप-गोल्डन ऑब्जर्व्हर** हे या परिषदेचं आकर्षण ठरलं. 'रयत' मधील एक कलाशिक्षक प्रताप जगताप आणि १६ कलाशिक्षकांनी २४ X २४ फूट या आकारातील क्षेपणास्त्र प्रक्षेपणाची काढलेली भव्य रांगोळी तर सगळ्यांचं लक्ष वेधून घेत होती.

तीन दिवसांमध्ये पार पडलेली विविध मान्यवरांची व्याख्यानं, चर्चा, प्रात्यक्षिकं म्हणजे विद्यार्थी-शिक्षकांसाठी बौद्धिक मेजवानीच ठरली. भारतीय भौतिकशास्त्र शिक्षक संघटनेचे (पुणे) अध्यक्ष प्रा. वसंत वाघ, इस्रोमधील निवृत्त समूह संचालक सुरेश नाईक आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत या विज्ञान परिषदेचा समारोप करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. डॉ. अरविंद बुरूंगले, सहसचिव प्रा. डॉ. नानासाहेब गायकवाड, समन्वयक प्रा. डॉ. बी. टी. जाधव यांच्यासह संयोजन, सल्लागार समितीचे सदस्य, प्राध्यापक, शिक्षक आणि सेवकांनी ही पहिली रयत विज्ञान परिषद यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रचंड परिश्रम घेतले.

■ ■ ■

पान क्र. ६० वरून

विकासशील, प्रयोगशील, वर्धिष्णु आणि सामाजिक बांधिलकी पाळणारे आहे. कोणालाही अभिमान वाटेल असा निर्मळ शुद्ध वारसा या कुटुंबाला लाभलेला आहे. भगवान महावीरांच्या एका प्राकृत चरित्रात दोन गोष्टी सांभाळायचा आग्रह केला आहे: कुल आणि शील. भवरलाल आणि कांताबाई हे कुल आणि शील या दोन ऊर्जांचे स्रोत म्हणून पुढील पिढ्यांना प्रेरक ठरतील, असा मला विश्वास वाटतो.

■ ■ ■